सारांश

# अन्न सुरक्षा व दारिद्र्य निर्मुलनाच्या संदर्भात लघुमत्स्योद्योगांच्या संरक्षणासाठी ऐच्छिक मार्गदर्शक तत्त्वे



प्रक ाशक

**आंतरराष्ट्रीयमत्स्यकामगार सहाय्यक समूह**

**(इंट रनॅशनल कलेक्टीव्ह इन सपोर्ट ऑफ फिशवर्कर्स) (आयसीएसएफ)**

२७, क ॉलेजरोड ,चेन्नई ६०००० ६

भारत

दूरध्वनी : (९१) ४४ २८२७ ५३०३

फॅक्स: (९१) ४४ २८२ ४४५७

ईमेल: icsf@icsf.net

संके तस्थळ: www.icsf.net

आयसीएसएफ ही जगभरातील मत्स्यकामागारांशी निगडीत असलेल्या महत्त्वाच्या प्रश्नांवर काम करणारी आंतरराष्ट्रीय संघटना आहे. आयसीएसएफ ही संयुक्त राष्ट्र संघाच्या आर्थिक व सामाजिक समितीची मान्यता असलेली तसेच आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या बिगर शासकीय संस्थांच्या विशेष सुचीमधेही समावेश असलेली संस्था आहे. तसेच आयसीएसएफला एफएओची (FAO) (अन्न व कृषी संघटना) संपर्क संस्था असल्याचा दर्जादेखील बहाल केला गेला आहे. समूह संघटक, शिक्षक, तंत्रज्ञ, संशोधक, वैज्ञानिक यासारख्या व्यक्तींचे आंतरजाल असलेल्या आयसीएसएफच्या कामामध्ये संनियंत्रण व संशोधन, विनियमन व प्रशिक्षण, मोहिमा व कृतिकार्यक्रम याचबरोबर स्थानिक समूहांचा देखील समावेश आहे.

२०१६

अनुवाद : अश्विनी जोग

चित्रे व रचना : अर्जुन शंकर

ISBN : 978 93 80802 67 1

सारांश

# अन्न सुरक्षा व दारिद्र्य निर्मुलनाच्या संदर्भात लघुमत्स्योद्योगांच्या संरक्षणासाठी ऐच्छिक मार्गदर्शक तत्त्वे

संयुक्त राष्ट्र संघाच्याअन्न व कृषीसंस्थेच्या सदस्य राष्ट्रांनीअन्न सुरक्षा व दारिद्रय निर्मुलनाच्या संदर्भात शाश्वत लघुमत्स्योद्योगांच्या संरक्षणासाठीच्या ऐच्छिक मार्गदर्शक तत्त्वांचा (एसएसएफ गाईड लाईन्स) अंगीकार करून जून २०१४ मध्ये त्यांना अधिकृत आंतरराष्ट्रीय दस्तावेज म्हणून मान्यता दिली.

या मार्गदर्शक तत्त्वांचे वैशिष्टच असे की त्यांची निर्मिती जगभरांतील लघुमत्स्योद्योग व्यावसायिकांनी आपापल्या देशांमध्ये आपल्या कामाचा दर्जा व देशातील मत्स्योद्योग क्षेत्रातील आपले योगदान यांची योग्य दखल घेण्यात यावी याकरता केलेल्या संघर्षाच्या दीर्घ इतिहासातून झालेली आहे.

जगभरात जरी लघुमत्स्योद्योगी व्यावसायिक हे मत्स्याधारित अर्थव्यवस्थेचा कणा असले तरी मत्स्योद्योग क्षेत्राच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये त्यांना नेहमीच दुर्लक्षित व भेदभावपूर्ण वागणूक दिली गेली आहे आणि तरीही, अनेक देशांमध्ये हे क्षेत्र जोमाने तग धरून राहिलेले आढळते.

परंतु, अनेक वर्षांच्या या अधिकृत दुर्लक्षिततेचा परिणाम म्हणून, मासेमारीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा असला तरीही लघुमस्त्योद्योग व्यावसायिकांचे समूह अजूनही गरीब व दुर्बल राहिले असून आपल्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाच्या मानवी हक्कांपासूनही वंचित राहिले आहेत.

ही मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे अन्न व कृषी संस्थेच्या सदस्य राष्ट्रांनीवरील सत्य परिस्थितीची दखल घेतल्याचा पुरावा आहे व त्याचबरोबर लघु मत्स्योद्योगास पुन्हा एकदा मत्स्योद्योग विकास व व्यवस्थापनाच्या केंद्रस्थानी आणण्याकरिता केलेल्या प्रयत्नांचा देखील पुरावा आहे.

आंतरराष्ट्रीय मत्स्यकामगार सहाय्यक समूह (आयसीएसएफ) या एका सामाजिक संस्थेने सदर मार्गदर्शक तत्त्वे निर्मितीची प्रक्रिया अत्यंत सहभागी पद्धतीने घडवूनआणण्यामध्ये कळीची भूमिका बजावली आणि म्हणूनच संयुक्त महासंघाच्या अन्न व कृषीसंस्थेने सदर मार्गदर्शक तत्त्वे, जगभरातील लघुमत्स्यकामगार हक्कांच्या पुरस्कर्त्या व आयसीएसएफच्या कार्यकारी सचिव असलेल्या, श्रीमती चंद्रिका शर्मा यांच्या स्मृतीस अधिकृतपणे अर्पण केली आहेत. मार्च २०१४ मध्ये मलेशियन एअरलाईन्सचे एमएच ३७० हे विमान नाहीसे होण्याच्या घटनेपासून त्या बेपत्ता आहेत; सदर मार्गदर्शक तत्त्वांना पाठींबा मिळविण्याकरिता संयुक्त महासंघाच्या अन्न व कृषी संस्थेने आयोजित केलेल्या मंगोलिया येथील परिषदेस त्या निघाल्या होत्या.

सदर मार्गदर्शक तत्त्वांना १०० हून अधिक परिच्छेदअसून ते १३ विभागांमध्ये विभागलेले आहेत. येथे केवळ त्या मार्गदर्शक तत्त्वांचा सारांश दिलेला आहे. या सारांशाची निर्मिती आयसीएसएफ चे संस्थापक सदस्य जॉन कुरीएन यांनी केली असून त्यांनी गेली चार दशकांहून अधिक काळ जगभरातील विविध देशांतील व विशेषतः भारतातील केरळमधील, लघुमत्स्यकामगार समूहांसोबत काम केले आहे.

# प्रस्तावना

अन्न व कृषी संस्थेच्या (एफएओ) च्या १९९५ सालच्या जबाबदार मत्स्योद्योगक्षेत्र आचारसंहितेस पूरक म्हणून एसएसएफ मार्गदर्शक तत्त्वांची निर्मिती झाली. त्यामध्ये लघुमत्स्योद्योगक्षेत्रे हाताळण्यात आली आहेत व एकूण मुल्यसाखळीतील पुरुष व महिला या दोघांच्याही सर्व प्रकारच्या कामांचा यामध्ये समावेश केला गेला आहे. जागतिक पातळीवर होणाऱ्या एकूण मासेमारीमध्ये लघुमत्स्योद्योगाचा निम्मा वाटा असून जगातील ९० टक्के मच्छिमार व मत्स्यकामगार या क्षेत्रातून रोजगार कमावतात. लघुमत्स्योद्योग व मच्छिमारसमूह हे एका गतिशील व वैविध्यूर्ण उपक्षेत्राचे प्रतिनिधित्व करतात व त्यांची वैशिष्टचे त्यांच्या स्थानावर अवलंबून असतात. हे बहुतेकदा कौटुंबिकपातळीवरील उद्योग असतात ज्यांची पाळेमुळे स्थानिक समुदायांमध्ये घट्ट पणे रोवलेली असतात. ते अजूनही उपेक्षितच राहिले आहेत. लघुमत्स्योद्योग समूहांतील गरिबी बहुआयामी स्वरुपाची आहे. लघुमत्स्योद्योगांचे योगदान संरक्षित करणे व वाढविण्यामध्ये अनेक अडथळे व आव्हाने आहेत. ही मार्गदर्शक तत्त्वे एका वैशिष्टचपूर्ण सहभागी व चर्चात्मक पद्धतीतून निर्माण झाली आहेत. ती मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत असून त्यास प्रोत्साहन देणारी आहेत.




# १. उद्दिष्टे

लघुमत्स्योद्योगांद्वारे खालील बाबींची पूर्तता व्हावी याकरिताएसएसएफ मार्गदर्शक तत्त्वांची उद्दिष्टे आखलेली आहेत:

- जागतिक अन्नसुरक्षा बळकटकरणे
- पृथ्वीच्या आर्थिक सामाजिक भविष्यामधील आपले योगदान वाढवणे
- मत्स्यकामगारांच्या आर्थिक सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यात आपले योगदान देणे, व
- मत्स्यक्षेत्र संसाधनांचा शाश्वत वापर घडवूनआणणे

या प्रक्रियेमध्ये, सदर मार्गदर्शक तत्त्वांमुळे लघुमत्स्योद्योगाची भूमिका, योगदान व क्षमता याविषयी जनजागृती घडवण्यातआली पाहिजे..

सदर उद्दिष्टे मानवी हक्काधारित पद्धतीला प्रोत्साहन देण्यातून गाठलीगेली पाहिजेत. निर्णयप्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरिता तसेच मत्स्यक्षेत्र संसाधनांचा शाश्वत वापर घडवूनआणण्याची जबाबदारी घेण्याकरिता लघुमत्स्योद्योग समूहांची क्षमताबांधणी केलीगेली पाहिजे. सदर मार्गदर्शक तत्त्वांमध्ये विकसनशील देशांच्या गरजा तसेच लघुमत्स्योद्योग समूहांतील दुर्बल व उपेक्षित गटांच्यासमस्या व फायदेयावर भर दिला गेला आहे.



# २. स्वरूप व आवाका

एसएसएफ मार्गदर्शक तत्त्वे ही ऐच्छिक व जागतिक पातळीवरील असून विकसनशील देश त्यांच्या केंद्रस्थानी आहेत. समुद्री व अंत:स्थ जलक्षेत्रांतील मत्स्योद्योगाशी निगडीत सर्व प्रकारची कामे या मार्गदर्शक तत्त्वांच्या आवाक्यात असतील. मत्स्योद्योगाशी संबंधित सर्व प्रकारचे गुंतवणूकदार या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये विचारात घेतले गेले आहेत – राज्ये, आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था, नागरी संस्था, बिगर शासकीय संस्था, शैक्षणिक संस्था तसेच खासगी क्षेत्रे. लघुमत्स्योद्योगांतील वैविध्याची यामध्ये दखल घेतली गेली असून त्यांची कोणताही एक मापदंड वापरून व्याख्या करता येणार नाही हे त्यात मान्य केले गेले आहे. शासनसंस्थांनी सहभागी व पारदर्शक प्रक्रिया वापरून कोणते मत्स्योद्योग हे लघु स्वरूपाचे आहेत ज्यायोगे ते या मार्गदर्शक तत्त्वांच्या कक्षेत येऊ शकतील, हे ठरवावे, व त्यातील सर्वाधिक दुर्बल गट शोधून काढावे कारण ही मार्गदर्शक तत्त्वे त्यांच्याकरिताच सर्वाधिक उपयुक्त ठरतील. राष्ट्रीय कायदेव्यवस्था व कायदेसंस्था यांच्या आधीन राहून सदर मार्गदर्शक तत्त्वांचा उलगडा व व्यवहार्य वापर करण्यात यावा.



# ३. दिशादर्शक तत्त्वे

ही मार्गदर्शक तत्त्वे १३ दिशादर्शक तत्त्वांवर आधारित आहेत. आंतरराष्ट्रीयमानवी हक्क मानके, जबाबदार मत्स्योद्योगाची मानके व शाश्वत विकासपद्धती, दुर्बल व उपेक्षित गट ांकडेलक्ष पुरविणे व उत्तरोत्तर जाणवणाऱ्या अन्नसुरक्षेच्या अधिकाराला सहाय्य करण्याची गरज, यांवर ही तत्त्वे आधारलेली आहेत.

ही दिशादर्शक तत्त्वे अशी:

१. मानवी हक्क व आत्मसन्मान

२. संस्कृतींचा आदर

३. भेदभाव–विरहीतता

४. लिंगभाव समानता व सामायिकता

५. सामायिकता व समानता

६. परस्परचर्चा व सहभाग

७. कायद्याचे अनुशासन

८. पारदर्शकता

९. उत्तरदायित्त्व

१०. आर्थिक ,सामाजिक व पर्यावरणीय शाश्वतता

११. सर्वांगिण व एकात्मिकदृष्टिकोन

१२. सामाजिक जबाबदारी

१३. प्रात्यक्षिकता व आर्थिक सामाजिक व्यवहार्यता

# ४. अन्य आंतरराष्ट्रीय दस्तावेजांशी संबंध

सदर एसएसएफ मार्गदर्शक तत्त्वांचा अन्वयार्थ लावताना व ती कार्यान्वित करताना, सध्या अस्तित्वात असलेले राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कायदे व कर्तव्ये यांच्याशी सुसंगतता राखली गेली पाहिजे, तसेच सध्या लागू असलेल्या प्रादेशिक व राष्ट्रीय दस्तावेजांच्या अनुषंगाने स्वीकारलेल्या ऐच्छिक बांधिलकीची दखल सुद्धा घेतली गेली पाहिजे.

कायद्यातील दुरुस्त्यांकरिता सहाय्य म्हणून, किंवा नवीन पूरक कायदेनिर्मिती किंवा तरतुदी करण्याकरिताही मार्गदर्शक तत्त्वे उपयुक्त ठरूशकतील. परंतु या मार्गदर्शक तत्त्वांतील कोणत्याही बाबींचा अन्वयार्थ लावताना आंतरराष्ट्रीय कायद्यांतर्गत असलेली शासनाची कर्तव्ये किंवा हक्क सीमित होऊ शकणार नाहीत किंवा त्यांवर मर्यादा घातली जाऊ शकणार नाही.



# ५. लघुमत्स्योद्योगातील वापराधिकाराचे नियमन व संसाधन व्यवस्थापन

## अ. वापराधिकाराचे जबाबदार नियमन

लघुमत्स्योद्योग समुहांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासातील यशाकरिता तसेच त्यांचे मानवी हक्क प्रत्यक्षात आणण्याकरिता, वापराधिकाराचे जबाबदार नियमन केंद्रभूत ठरते. लघुमत्स्योद्योग समुहांना मत्स्य संसाधनांचे, मत्स्यक्षेत्रांचे तसेच सभोवतालच्या जंगल व जमिनीचे सुरक्षित, सामायिक व सामाजिक-सांस्कृतिक दृष्ट्यासुसंगत वापराधिकार असले पाहिजेत. महिलांच्या वापराधिकाराकडे विशेष लक्ष दिले गेले पाहिजे. सर्व प्रकारच्या वैध वापराधिकारांचा शोध घेऊन त्यांची नोंद केली गेली पाहिजे व त्यांचे पालन केले गेले पाहिजे. आदिवासी व वांशिक अल्पसंख्यांक समुहांना जलजन्य संसाधने व जमिनींप्रति असलेले पारंपारिक व प्राधान्यपूर्ण हक्क विशेषत्त्वाने लक्षात घेऊन, गरज असल्यास कायदे करून, हे काम हाती घेतले पाहिजे. जिथे कायद्यांतील सुधारणांद्वारे महिलांना हक्क प्राप्त झाले असतील तिथे पारंपारिक वापराधिकार व्यवस्थेमध्ये त्यांचा योग्य प्रकारे समावेश करून घेतला गेला पाहिजे. स्थानिक जलजन्य व किनारपट्टी पर्यावरण व्यवस्थेचे पुनरुज्जीवन, संवर्धन, संरक्षण व सहव्यवस्थापन करण्यात आदिवासी व लघुमस्त्योद्योग समुह बजावत असलेल्या महत्त्वाच्या भूमिकेची दखल घेतली गेली पाहिजे. ज्या ठिकाणी जमीन व जल संसाधने सरकारच्या ताब्यात किंवा नियंत्रणात असतील तेथे वापराधिकार निश्चित करताना सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय उद्दिष्टे लक्षात घेतली गेली पाहिजेत, विशेषतः जेंव्हा त्यांचा वापर व व्यवस्थापन लघुमत्स्योद्योग समुहांकडून एकत्रितपणे केला जात असेल.

लघुमत्स्योद्योगांना राष्ट्रीय जलक्षेत्रांमध्ये मासेमारीकरिता प्राधान्य मिळावे असे जबाबदार मत्स्योद्योगाच्या आचारसंहितेमध्ये समाविष्ट केले गेले आहे (कलम ६.१८). याचा आधार घेऊन शासनव्यवस्थांनी केवळ लघुमत्स्योद्योगांकरिता जलक्षेत्रे राखीव ठेवणे यासारख्या उपाययोजना अंमलात आणल्या पाहिजेत. ही संसाधने उपलब्ध करून देण्याविषयी बाह्य संस्थांशी करार करण्यापूर्वी अशा क्षेत्रांवरील लघुमत्स्योद्योग समुहांचे अधिकार प्रामुख्याने लक्षात घेतले गेले पाहिजेत.

लघुमत्स्योद्योग क्षेत्रांचा वापर करण्याकरिता बाह्य वापरदार अधिकाधिक स्पर्धा निर्माण करीत आहेत, ज्यामुळे संघर्ष निर्माण होत आहे. लघुमत्स्योद्योग समुहांना विशेष सहाय्य मिळावे, तसेच त्यांना मनमानी करून हाकलून दिले जाऊ नये व त्यांच्या वैध वापराधिकारावर गदा आणली जाऊ नये किंवा ते काढून घेतले जाऊ नयेत याची खातरजमा शासनसंस्थांनी केली पाहिजे. मोठे विकास प्रकल्प हाती घेण्यापूर्वी शासनसंस्थांनी व अन्य बाह्य संस्थांनी अर्थपूर्ण चर्चा घडवून आणून, तसेच दूरस्थ परिणामांचे अभ्यास हाती घेऊन, लघुमत्स्योद्योग समुहांवरील संभाव्य परिणामांचे मापन केले पाहिजे.

लघुमत्स्योद्योग समुहांमध्ये वापराधिकारावरून उद्भवणारे तंटे शासनसंस्थांनी कालबद्ध पद्धतीने, तसेच वाजवी खर्चात व परिणामकारकपणे सोडविले पाहिजेत व पुनःस्थापना, हस्तांतरण, वाजवी नुकसानभरपाई व परतावा, यासारख्या उपाययोजना करून त्यांची त्वरित अंमलबजावणी केली पाहिजे.

नैसर्गिक आपत्ती आणि/किंवा सशस्त्र संघर्षांमुळे होणाऱ्या विस्थापनेचा लघुमत्स्योद्योग समुहांवर वाढता परिणाम दिसून येत आहे. शाश्वत मत्स्योद्योगाचा विचार ध्यानात ठेवून शासनसंस्थांनी पारंपारिक मत्स्यक्षेत्रे व किनारपट्टीची उपलब्धता पुनःप्रस्थापित करण्याकरिता सर्व प्रकारचे प्रयत्न केले पाहिजेत. अशा परिस्थितीमध्ये, मानवी हक्कांच्या गंभीर उल्लंघनास तोंड द्यावे लागलेल्या समुहांना त्यांच्या आयुष्याची पुनर्बांधणी करण्याकरिता सहाय्य करण्याच्या यंत्रणा उभारल्या गेल्या पाहिजेत व वापराधिकार पद्धतींमधील महिलांविरोधी असलेले सर्व प्रकारचे भेदभाव नष्ट केले गेले पाहिजेत.

## ब. शाश्वत संसाधन व्यवस्थापन

मत्स्यसंसाधनांच्या दीर्घकालीन संवर्धनाकरिता व शाश्वत वापराकरिता पावले उचलली गेली पाहिजेत व लघुमत्स्योद्योगाच्या गरजा व त्यांतील संधी यांकडे योग्य प्रकारे लक्ष पुरविले पाहिजे. हक्कांबरोबर जबाबदाऱ्यादेखील येतातच. संवर्धन व शाश्वत वापराविषयीच्या कर्तव्यांचे पालन करून वापराधिकार मिळविण्याशी समतोल साधला जातो.

संबंधित मत्स्यप्रजातींना व पर्यावरणाला कमीत कमी धोका पोहोचेल अशा प्रकारच्या मासेमारीच्या पद्धतींचा अवलंब लघुमत्स्योद्योग समुहांकडून केला गेला पाहिजे. संसाधन व्यवस्थापनाची जबाबदारी घेण्याकरिता शासनसंस्थेने लघुमत्स्योद्योगास सहाय्य दिले पाहिजे. शासनसंस्थांनी व्यवस्थापनाच्या उपाययोजनांची आखणी, नियोजन आणि अंमलबजावणी करण्यामध्ये समुहांना सहभागी करून घेतले पाहिजे व त्यात महिला तसेच अन्य दुर्बल गटांचा सामायिक सहभागही सुनिश्चित केला पाहिजे. राष्ट्रीय कायद्यांच्या कक्षेत राहून शासनसंस्थांनी सहभागी व्यवस्थापन पध्दतीस प्रोत्साहन दिले पाहिजे.

शासनसंस्थांनी लघुमत्स्योद्योगांसाठी योग्य असलेल्या व लागू पडू शकणाऱ्या देखरेख, नियंत्रण व संनिरीक्षण व्यवस्था (एमसीएस व्यवस्था) प्रस्थापित केल्या पाहिजेत व त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. शासनसंस्थांनी मासेमारीतील सर्व प्रकारच्या अवैध व घातक पद्धतींना प्रतिबंध करून, निर्बंध घालून त्यांचे निर्मुलन केले पाहिजे, तसेच लघुमत्स्यकामगारांनी एमसीएस व्यवस्थांना सहाय्य केले पाहिजे व अधिकारीवर्गाला व्यवस्थापनाकरिता आवश्यक ती माहिती पुरविली पाहिजे.

कायदेशीर प्रक्रियांच्या आधारे, शासनसंस्थांनी सहव्यवस्थापन पद्धतीतील सर्व घटकांच्या भूमिका व जबाबदाऱ्यांविषयी स्पष्टता दिली पाहिजे. त्याच्याशी संबंधित असलेल्या स्थानिक व राष्ट्रीय व्यावसायिक व्यासपीठे / संघटनांमध्ये लघुमत्स्योद्योगास प्रतिनिधित्त्व मिळाले पाहिजे व मत्स्योद्योग विषयक धोरणे व निर्णयप्रक्रियेमध्ये त्यांना सहभागी होता आले पाहिजे.

सहव्यावास्थापन पद्धतीस प्रोत्साहन देत असतानाच, राज्यसंस्था व लघुमत्स्य व्यावसायिक या दोघांनीही, मासेमारी करणाऱ्या, तसेच मासेमारीपूर्व व मासेमारी पश्चात करावयाच्या कामांमध्ये गुंतलेल्या महिला व पुरुषांना त्यांचे ज्ञान, दृष्टि कोन व गरजा मांडण्यास सहाय्य केले पाहिजे.

सामायिक वापर असलेली जलक्षेत्रे व संसाधने यांच्याशी संबंधित सीमाप्रश्न उद्भवल्यास राज्यसंस्थांनी लघुमत्स्योद्योग व्यावसायिकांचे वापराधिकार सुरक्षित असल्याची खातरजमा केली पाहिजे.

अतिरिक्त मासेमारीस उत्तेजन मिळेल व भरमसाठ मासेमारी होऊन लघुमत्स्योद्योगांवर विपरीत परिणाम होऊ शकेल अशी धोरणे व आर्थिक उपाय शासंसंस्थांनी टाळले पाहिजेत.



# ६. सामाजिक विकास, रोजगार व सन्मानपूर्ण काम

सर्व घटकांनी लघुमत्स्योद्योग विकास व व्यवस्थापनाप्रति सर्वसमावेशक दृष्टिकोन बाळगला पाहिजे. राज्यसंस्थांनी आरोग्य, शिक्षण, साक्षरता, संगणकीय समावेशकता व अन्य तांत्रिक कौशल्यांमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

राज्यसंस्थांनी लघुमत्स्योद्योगाच्या संपूर्ण मुल्यसाखळीमधील सर्व प्रकारच्या मत्स्यकामगारांकरिता सामाजिक सुरक्षा योजनांना उत्तेजन दिले पाहिजे. राज्यसंस्थांनी बचत, कर्जे, विमा यासारख्या योजनांच्या विकासाला सहाय्य करून नया सेवांमध्ये महिलांचाही समावेश असेल व त्यांनाही त्या उपलब्ध असतील यावर भर दिला पाहिजे.

लघुमत्स्योद्योगाच्या संपूर्ण मुल्यसाखळीमधील सर्व प्रकारची कामे ही आर्थिक दृष्ट्या उत्पादक व व्यावसायिक असल्याची दखल सर्व घटकांनी घेतली पाहिजे.

राज्यसंस्थांनी सर्वांकरिता सन्मानपूर्ण काम निर्माण करण्यास उत्तेजन दिले पाहिजे.

लघुमत्स्योद्योग व्यावसायिकांचा व मत्स्य कामगारांचा समाधानकारक जीवनमान मिळण्याचा हक्क उत्तरोत्तर प्रत्यक्षात उतरू शकेल याची खातरजमा राज्यसंस्थांनी केली पाहिजे. या व्यावसायिकांना व कामगारांना त्यांचे श्रम, भांडवल व व्यवस्थापन यांचा वाजवी मोबदला मिळू शकेल अशा प्रकारच्या समावेशक, भेदभावविरहित व सशक्त आर्थिक धोरणांचा पाठपुरावा राज्यसंस्थांनी केला पाहिजे. राज्यसंस्था व अन्य घटकांनी रोजगाराच्या वैकल्पिक संधींना सहाय्य केले पाहिजे. लघुमत्स्योद्योग समुहांना मत्स्यक्षेत्रांशी संबंधित अन्य उपक्रम पार पडण्यास योग्य असे वातावरण निर्माण केले गेले पाहिजे.

उदरनिर्वाहाकरिता स्थलांतर हा उपाय सर्वसामान्यपणे वापरला जातो. मत्स्यकामगारांनी सीमा पार करून जाण्यामागील कारणे व त्याचे परिणाम यांची राज्यसंस्थांनी दखल घेऊन त्यावर उपाययोजना केली पाहिजे.

व्यावसायिक आरोग्य, सुरक्षितता व अन्यायकारक रोजगारपद्धतींची ही दखल राज्यसंस्थांनी घेतली पाहिजे. बळजबरीचे श्रम व कर्जाकरिता होणारी वेठबिगारी यांना निर्बंध घालून त्यांचे उच्चाटन करण्याचे प्रयत्न राज्यसंस्थांनी केले पाहिजेत.

मुलांचे हित व त्यांच्या भविष्याकरिता असलेले शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन राज्यसंस्थांनी शाळा व शैक्षणिक सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

सागरी व अंतर्गत जलक्षेत्रांमधील सुरक्षिततेचा गुंतागुंतीचा प्रश्न व त्याच्या अभावामागील विविध कारणांची योग्य दखल सर्व घटकांकडून घेतली गेली पाहिजे.

लघुमत्स्योद्योग क्षेत्रामधील सुरक्षितता व व्यावसायिक आरोग्य हे मत्स्योद्योग क्षेत्राच्या सर्वसाधारण व्यवस्थापनाचा एकात्मिक घटक बनले पाहिजे.

सशस्त्र संघर्षाच्या प्रसंगांमध्ये राज्यसंस्थांनी लघुमत्स्योद्योग क्षेत्रांतील गुंतवणूकदारांचे मानवी हक्क व आत्मसन्मान सुरक्षित राखले पाहिजेत.

# ७. मूल्यसाखळी, मासेमारी पश्चातची कामे व व्यापार

मासेमारी पश्चात करावयाच्या कामांचे उपक्षेत्र हे लघुमत्स्योद्योग क्षेत्राच्या केंद्रस्थानी असल्याची दखल सर्व संबंधित घटकांनी घेतली पाहिजे. या उपक्षेत्रात महिला मध्यवर्ती भूमिका बजावत असल्याची दखलही सर्व घटकांनी घेतली पाहिजे.

मासेमारी पश्चातच्या कामांच्या या उपक्षेत्रात योग्य भौतिक संरचना, संस्थात्मक संरचना व क्षमताबांधणी करिता गुंतवणूक करण्यास राज्यसंस्थांनी प्रोत्साहन दिले पाहिजे व त्यांत गुंतवणूक केली पाहिजे.

मत्स्योद्योग कामगारांच्या व मच्छिमारांच्या पारंपारिक व्यासपीठांना मान्यता दिली पाहिजे.

मासेमारी पश्चातच्या काळातील नुकसान टाळण्याचे व मूल्यवर्धन करण्याचे मार्ग शोधले गेले पाहिजेत.

राज्यसंस्थांनी लघुमत्स्योद्योगजन्य उत्पादनांच्या स्थानिक, राष्ट्रीय, प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामायिक व भेदभावविरहित व्यापारास उत्तेजन दिले पाहिजे. ज्या समुहांना मासे अत्यंत स्वस्त दरात उपलब्ध असतात व त्यामुळे ज्यांच्या आहारामध्ये माशांचा प्रामुख्याने अंतर्भाव असतो अशा समुहांच्या पोषणावर आंतरराष्ट्रीय मत्स्यव्यापारास उत्तेजन दिल्यामुळे विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेतली गेली पाहिजे.

आंतरराष्ट्रीय व्यापारातून मिळालेल्या फायद्याचे न्याय्य वाटप झाले पाहिजे तसेच बाजारपेठेची मागणी पुरविण्याकरीता मत्स्य संसाधनांच्या अतिरिक्त व अवाजवी वापरावर निर्बंध घालण्याकरिता प्रभावी मत्स्यक्षेत्र व्यवस्थापन व्यवस्था प्रस्थापित केल्या गेल्या पाहिजेत.

हाती घेतलेल्या सर्व धोरणे व प्रक्रियांमध्ये (अन्य अभ्यासांसह) पर्यावरणीय, सामाजिक व इतर संबंधित अभ्यासांचा एकात्मिकतेने अंतर्भाव केला गेला पाहिजे, ज्यायोगे आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे लघुमत्स्योद्योगांच्या पर्यावरणावर, संस्कृतीवर, अन्न सुरक्षेवर व रोजगारावर होणाऱ्या दुष्परिणामांचे मोजमाप होऊ शकेल व त्यावर सामायिकतेने उपाययोजना केली जाऊ शकेल.

लघुमत्स्योद्योगाच्या मुल्यसाखळीतील सर्व गुंतवणूकदारांना व्यापार व बाजारपेठ विषयक माहिती योग्य वेळी व अचूकपणे उपलब्ध होण्याची व्यवस्था राज्यसंस्थांनी करून दिली पाहिजे.

# ८. लिंगभाव समानता

लघुमत्स्योद्योगातील सर्व धोरणांमध्ये लिंगभाव समानतेला मुख्य धारेमध्ये आणण्याच्या प्रयत्नांचा एकात्मिकपणे अंतर्भाव केला गेला पाहिजे. महिलांच्या प्रश्नांशी संबंधित ज्या आंतरराष्ट्रीय दस्तावेजांशी राज्यसंस्थांची बांधिलकी असेल त्यांची अंमलबजावणी व आंतरराष्ट्रीयमानवी हक्क कायद्यांतर्गतअसलेली त्यांची कर्तव्ये, यांचे राज्यसंस्थांनी पालन केलेपाहिजे.

महिलांच्या विरोधात होणारा लिंगभेद हातळण्याकरिता नेमक्या उपाययोजना हाती घेतल्या पाहिजेत. धोरणे व कायद्यांद्वारे लिंगभाव समानता प्रस्थापित केली पाहिजे व जी धोरणे व कायदे याच्याशी सुसंगत नसतील त्यांत बदल केलागेला पाहिजे.

महिलांचे स्थान उंचावण्याकरिता व लिंगभाव समानता निर्माण करण्याकरिता केल्या गेलेल्या धोरणांचा, कायद्यांचा व उपक्रमांचा काय दीर्घकालीन परिणाम होतो आहे हे मोजण्याची कृतीशील मुल्यमापन व्यवस्था निर्माण केलीगेली पाहिजे.

महिलांच्या कामातमहत्त्वाचे ठरेलअशा सुसंगत तंत्रज्ञानामध्ये सुधारण घडवूनआणल्या पाहिजेत.



# ९. आपत्तीची जोखीम व वातावरण बदल

वातावरणातील बदलाचा सामना करण्याकरितातातडीचीव महत्त्वाकांक्षी कृती आवश्यक असते. लहान बेटांवरराहणाऱ्या लघुमत्स्योद्योग समुहांकडे विशेष लक्ष पुरविले गेले पाहिजे. बहुक्षेत्रीय सहयोग असलेली एकात्मिकव सर्वांगीण पद्धत अंगीकारणे आवश्यक आहे. गरज असेल त्याप्रमाणे बदल, भरपाई व मदत करण्याचे नियोजन केले गेले पाहिजे.

जर लघुमत्स्योद्योगावरील परिणाम मानव निर्मित आपत्तींमुळे झालेले असतील तर त्यास जबाबदार असलेल्या पक्षास उत्तरदायी ठरवलेपाहिजे. आपत्ती व वातावरणबदल यांचे मासेमारी पश्चातची कामे व व्यापार यांच्या विविध बाजूंवर होणारे परिणाम लक्षात घेतले गेले पाहिजेत. आपत्ती निवारण व पुनर्वसन करताना पहिल्यापेक्षा चांगली पुनर्बांधणी करण्याची संकल्पना राबिविली गेली पाहिजे. संपूर्ण मुल्यसाखळीमध्ये ऊर्जेचीकार्यक्षमतागाठण्यासउत्तेजन व प्रोत्साहन दिले गेले पाहिजे.



# १०. धोरण सुसंगती, संस्थात्मक समन्वय व सहयोग

लघुमत्स्योद्योग समुहांमध्ये सर्वांगीण विकासास प्रोत्साहन देण्याकरिता राज्यसंस्थांनी धोरण सुसंगतीची गरज ओळखली पाहिजे व त्या दिशेने काम केले पाहिजे.

लघुमत्सोद्योगांचे हितसंबंध व एकात्मिक किनारपट्टी व्यवस्थापनातील त्यांची भूमिका यांची योग्य दखल घेऊन राज्यसंस्थांनी अभिक्षेत्रीय नियोजन पद्धती विकसित करून राबविली पाहिजे.


सागरी व अंतर्गत जलक्षेत्रांच्या व पर्यावरण व्यवस्थांच्या आरोग्यावर परिणाम करणाऱ्या धोरणांमध्ये सुसंगती साधण्याकरिता योग्य ती धोरण पद्धती राज्यसंस्थांनी अंगिकारली पाहिजे.

मत्स्यक्षेत्र धोरणामधून शाश्वत लघुमत्स्योद्योगविषयक दीर्घकालीन दृष्टी पुरविली गेली पाहिजे.

लघुमत्स्योद्योग समुहांकरिता सरकारी अधिकारी व संस्थांमध्ये संपर्क साधण्याकरिता विशिष्ट व्यक्ती सुस्पष्टपणे नियुक्त केल्या गेल्या पाहिजेत.

लघुमत्स्योद्योगातील सर्व गुंतवणूकदारांनी त्यांच्या संस्थांमध्ये सहयोग घडवून आणण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

लघुमत्स्योद्योगाच्या प्रभावी व्यवस्थापनामध्ये योगदान देऊ शकतील अशा स्थानिक प्रशासकीय संरचना निर्माण करण्यास राज्यसंस्थांनी प्रोत्साहन दिले पाहिजे. शाश्वत लघुमत्स्योद्योग सुरक्षित करण्याकरिता आंतरराष्ट्रीय, प्रादेशिक व उप-प्रादेशिक सहकार्य असण्याची गरज आहे.



# ११. माहिती, संशोधन व जनसंपर्क

लघुमत्स्योद्योगाच्या शाश्वतव्यवस्थापनाविषयी निर्णय घेण्याक रिता सुसंगत अशा माहिती संक लन व्यवस्था राज्यसंस्थांनी पारदर्शक पणे प्रस्थापित के ल्या पाहिजेत. प्रभावी निर्णय घेण्याक रिता माहिती व संपर्क यांची आवश्यक ता असते. राज्यसंस्थांनी भ्रष्ट ाचारासनिर्बंध घालण्याचा, तसेच पारदर्शक ता वाढ वूननिर्णय घेणाऱ्यांना उत्तरदायी बनविण्याचा प्रयत्न के लपाहिजे.

लघुमत्स्यव्यावसायिक ांचे समुह हे ज्ञानाचे साठे असतात, तसेच ज्ञान देणारे व घेणारेही असतात. जबाबदार लघुमत्स्योद्योग व शाश्वत विक ासाक रिताआवश्यक असलेली संबंधित माहिती उपलब्ध क रू नदिली गेली पाहिजे. लघुमत्स्यव्यावसायिक ांच्या समुहातील ज्ञान, संस्कृ ती, पद्धती व तंत्रज्ञान यांची दखल घेऊ नते नोंदवून ठे वलेगेले पाहिजे.

मासेमारीवर उदरनिर्वाह अवलंबून असलेल्या, विशेषतः महिला व आदिवासी, लघुमत्स्यव्यावसायिक ांच्या समुहांना राज्यसंस्थांनी साहाय्य के ले पाहिजे. माहितीचा प्रवाह वाहता ठे वण्याक रिता समूह, राष्ट्र ीय व उच्च पातळीवरील अस्तित्वात असलेल्या व योग्य अशा व्यासपीठ ांचाउपयोग क रू नघेतला पाहिजे.

राज्यसंस्थांनी लघुमत्स्योद्योगावरील संशोधनाक रिता निधी उपलब्ध क रू नदिला पाहिजे व माहिती संक लनव विश्लेषण, सहभागी व सहयोगी पद्धतीने क रण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

लिंगभावाधारीत परस्परसंबंधांच्या संदर्भात राज्यसंस्थांनी निरनिराळ्या विषयांमध्ये संशोधन क रण्यास उत्तेजन दिले पाहिजे ज्यायोगे लघुमत्स्योद्योगातील महिला व पुरुष या दोघांनाही समन्यायी पद्धतीने फ ायदे मिळावेत याक रिता आखावयाच्या रणनीतीला त्याचा उपयोग होईल.

लघुमत्स्योद्योगाची भूमिक ा लक्षात घेऊ न तसेच आहारात माशांचा उपयोग क रण्यामागील पोषण तत्त्वांविषयी जनजागृती क रण्याक रिताग्राहक शिक्षण क ार्यक्र मांमध्येराज्यसंस्थांनी मासे खाण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

# १२. क्षमता बांधणी

निर्णयप्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची क्षमता बळकट केली गेली पाहिजे.

लघुमत्स्योद्योगांना बाजारपेठेतील संधींचा फायदा घेता यावा याकरिता राज्यसंस्थांनी त्यांची क्षमता बांधणी केली पाहिजे

क्षमता बांधणी ही दुतर्फी प्रक्रिया असली पाहिजे. शाश्वत विकास व यशस्वी सह-व्यवस्थापन व्यवस्थेस सहाय्य करण्याकरिता ज्ञान व कौशल्ये यांचे संवर्धन केले गेले पाहिजे.



# १३. अंमलबजावणीस सहाय्य व संनियंत्रण


सर्व गुंतवणूक दारांना एसएसएफ मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी क रण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे

ही मार्गदर्शक तत्त्वे अंमलात आणण्याक रिता राज्यसंस्था क रीत असलेल्या ऐच्छि कप्रयत्नांना संयुक्त राष्ट्र संघव त्याच्या विशेष समित्या यांनी सहाय्य के लेपाहिजे.

राज्यसंस्था व अन्य सर्व गुंतवणूक दारांनी या मार्गदर्शक तत्त्वांविषयी जनजागृती क रण्याक रिता व त्यांच्या सुलभ व अनुवादित आवृत्त्यांचे अभिसरण क रण्याक रिताएक त्रक ामके लेपाहिजे.

संनियंत्रण व्यवस्थांचे महत्त्व ओळखले गेले पाहिजे. मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीक रिता रणनीती आखण्यात व राबविण्यात तसेच त्यांचे संनियंत्रण क रण्यात लघुमत्स्यव्यावसायिक समूहांच्या सुयोग्य प्रतिनिधींचा सहभाग असला पाहिजे.

अन्न व शेतकी संस्थेने (एफ एओ) एक जागतिक सहाय्य क ार्यक्र मविक सित क रण्याक रितासहाय्य व प्रोत्साहन दिले पाहिजे.





अन्न सुरक्षा व दारिद्रय निर्मुलनाच्या संदर्भात लघुमत्स्योद्योगांच्या संरक्षणासाठी ऐच्छिक मार्गदर्शक तत्वे याचे संपूर्ण स्वरूपातील लिखाण येथे उपलब्ध असेल :
http://www.fao.org/fishery/topic/18240/en



आंतरराष्ट्रीय मत्स्यकामगार सहाय्यक समूह
२७, कॉलेज रोड , चेन्नई ६००००६, भारत

ISBN 978 93 80802 46 6